महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीच्या प्रशासकीय कामकाजावरील खर्चासाठी सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये निधी वितरीत करणेबाबत.... (रुपये २.८० कोटी)

**महाराष्ट्र शासन**

**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग**

**शासन ज्ञापन क्रमांक : कौविउ-२०२२/प्र.क्र.११७/कौशल्य -१**

२ रा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०८ फेब्रुवारी, २०२३

वाचा :- १) वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक विअप्र २०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५.

२) वित्त विभाग, शासन परिपत्रक विअप्र २०२२/प्र.क्र.४३/अर्थसं- ३ दिनांक ४ एप्रिल, २०२२

३) कौशल्य,रोजगार,उद्योजकता व नाविन्यता विभाग,शासन निर्णय: क्रमांक कौविउ-२०२२/प्र.क्र.११७/कौशल्य -१,दिनांक २ ऑगस्ट, २०२२

४) महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांचे पत्र क्रमांक MSSDS/FAA/A/१२/२०२२-२३/१८५३, दिनांक ०७ डिसेंबर,२०२२.

**ज्ञापन :**

राज्यात कौशल्य विकासाशी निगडीत विविध उपक्रमांची अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी ही “नोडल एजन्सी” म्हणून कार्यरत आहे. या संस्थेच्या प्रशासकीय कामकाजावरील खर्चासाठी सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात रु. १०.०० कोटी इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला असून त्यापैकी रु.२.१० कोटी इतका निधी सं.क्र. ३ अन्वये कौशल्य विकास सोसायटीला वितरीत करण्यात आला आहे. सं.क्र. ४ अन्वये महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीने उपरोक्त अर्थसंकल्पित रु.१०.०० कोटी इतक्या निधीपैकी शिल्लक रु.७.९० कोटी इतका निधी वितरीत व खर्च करण्यास मान्यता देण्याची विनंती केली आहे.

२. सदर विनंतीस अनुसरुन सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये शिल्लक असलेल्या रु. ७.९० कोटी इतक्या निधीमधून अर्थसंकल्प प्रणालीवर उपलब्ध असलेला निधीच्या प्रमाणात रु.२.८० कोटी (दोन कोटी ऐंशी लाख फक्त) इतका निधी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीला या ज्ञापनान्वये वितरीत व खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. या ज्ञापनाद्वारे वितरीत करण्यात आलेला निधी “मागणी क्रमांक झेडए-२, २२३० कामगार व सेवायोजन, (०१)(०९) महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था (२२३० ६१२७), ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)” या लेखाशिर्षाखाली सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये खर्ची टाकण्यात यावा.

४. राज्य शासनाने या योजनेसाठी वितरीत केलेला निधी आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता यांनी कोषागारामधून आहरीत करून मुख्य कार्यकारी अधिकारी, महराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांना खर्चासाठी उपलब्ध करून देण्यात यावा.

याकरीता आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, नवी मुंबई यांना “नियंत्रक अधिकारी” तसेच सहायक संचालक (लेखा) कोकण भवन यांना “आहरण व संवितरण अधिकारी” म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांनी या संदर्भातील लेखे अद्ययावत ठेवावेत. उपरोक्त निधी ज्या कारणास्तव उपलब्ध करुन देण्यात आला आहे त्याच कारणास्तव खर्च करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी,मुंबई यांची राहील. तसेच प्रत्यक्ष खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) विहित कालमर्यादेत सादर करण्याची दक्षता आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, नवी मुंबई यांनी घ्यावी.

५. उक्त निधी खर्च करताना वित्त, नियोजन तसेच उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने खरेदी विषयक निर्गमित केलेल्या शासन निर्णय व परिपत्रकातील तरतुदींचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

६. सदरहू ज्ञापन,वित्तिय अधिकार नियम पुस्तिका, १९७८, दिनांक १५ मे २००९ अन्वये प्रशासनिक विभागास प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारास तसेच वित्त विभागाच्या सं.क्र. २ येथील शासन परिपत्रकास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २०२३०२०८१५२४३०४६०३ असा आहे. हे ज्ञापन डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MITHUN MOHANRAO SALUNKHE

Digitally signed by MITHUN MOHANRAO SALUNKHE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SKILLS EMPLOYMENT ENTERPREUNERSHIP AND INNOVATION DEPARTMENT, 2.5.4.20=eb410b645758d07ea6303743e3a96f12f7b5ea5c78305aa3546f1b05a4d188d9, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=928224E8C07F06F0A63241EEC16360F9961117B3DFDA771ED6746D1433B5EA7A, cn=MITHUN MOHANRAO SALUNKHE
Date: 2023.02.08 15:29:22 +05'30'

**( मिथुन साळुंखे )**

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, नवी मुंबई.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई.
३. महालेखापाल (लेखा परीक्षा /लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
४. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे.
५. अपर कोषागार अधिकारी, उप कोषागार कार्यालय, कोकण भवन, नवी मुंबई,
६. कार्यासन अधिकारी, प्रशा-३ कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. निवड नस्ती (कौशल्य-१), कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई.